| MHGA070005952022 |
| --- |

| | |
| --- | --- |
| प्राप्त तारीख | २९.०६.२०२२ |
| नोंदणी तारीख | २९.०६.२०२२ |
| निकाल तारीख | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | **०३ वर्षे १० महिने ०६ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
| --- | --- |
| **निशाणी –** | |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,<br>पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **५५/२०२२ अहेरी** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.०५.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २८८/२०२२** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, अहेरी, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **अनुसया सुरेश उरेल,**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – आलापल्ली पटेल मोहल्ला, ता. अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञा जैनवार**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
| --- | --- |
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०२.२०२२ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीची तारीख | ०४.०२.२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २०.०६.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १९.०९.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १६.०२.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोमा भाना टेकुलवार | -- | २०.०६.२०२२ | म.दा.प्र.अ. च्या कलम ६५(ई) अन्वये | **निर्दोष** | – | – |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | किशोर नानाजी बांबोळे (**निशाणी १२**) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | संतोष दादाजी दहेलकर (**निशाणी १२**) | नमुना वाहक |
| सा.क्र.३ | भाग्यश्री महेंद्र कांबळे (**निशाणी १२**) | तपासी अंमलदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ५५/२०२२ | एका पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये २० लिटर व पिवळया रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ८ लिटर गुळा मोहाची दारू |

**न्यायनिर्णय**

(दिनांकः ०५ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०४.०२.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०६.१५ वाजताच्या सुमारास मौजा आलापल्ली, तह. अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी एका पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये २० लिटर व पिवळया रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ८ लिटर गुळा मोहाची दारू विक्रीकरित असतांना बेकायदेशीरपणे बाळगली. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.११ पुढे नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.०४.०२.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०६.१५ वाजताच्या सुमारास मौजा आलापल्ली, तह. अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी एका पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये २० लिटर व पिवळया रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ८ लिटर गुळा मोहाची दारू मिळाली असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

२ आदेश ? आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने एकूण तिन साक्षीदार यांना तपासण्यात आले.

३. सा.क्र.१ **किशोर बांबोळे** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०२.२०२२ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांना मुखबीरकडून माहिती मिळाली की, मौजा आलापल्ली येथे आरोपी दारू बाळगुन विक्री करित आहे. त्यावरून ते, पंच व स्टाफसोबत चौकशी केली असता आरोपीच्या ताब्यातुन २८ लिटर गुळामोहादारू मिळून आली. त्यांनी तो जप्त केला. त्यावेळी पंचासमक्ष त्यातुन प्रत्येकी एक नमुना रासायनिक विश्लेषणाकरिता काढण्यात आला. तो नमुना त्यांनी कागदी सिल लावून सिलबंद केला. इतर माल नाश केला. त्यांनी जप्ती पंचनामा केला. त्यांनी जप्तीपत्रक तयार केला. त्यांना घटनास्थळ जप्ती पंचनामा नि.क्र.१४ व मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र.१५, सि.ए.फार्म नि.क्र.१६, फिर्याद नि.क्र.१३ व छापील पहिली खबर नि.क्र.१४ तयार केला. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सा.क्र.२ **संतोष दहेलकर** (नमुना वाहक) यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि.०३.०३.२०२२ रोजी ते पो.स्टे. अहेरी येथे कार्यरत होते. त्यांना सि.ए.मुददेमाल कामी नागपुर येथे दाखल करण्याकतिा त्यांची डयुटी लागली होती. दि.०४.०३.२०२२ रोजी मुददेमाल नागपु येथे घेवून गेली व दि.०४.०३.२०२२ रोजी मुददेमाल नागपुर येथे जमा केल्यानंतर पोचपावतीसह पोलीस स्टेशनला जमा केला. त्यांना बाहेरगाव डयुटीपास नि.क्र.२४, वापसी रिपोर्ट नि.क्र.२५ व पोच पावती नि.क्र.२६ दाखविली. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले होते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, ते पोलीस स्टेशनची

शासकीय वाहनाने नागपुरसाठी रवाना झाले होते. विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

५. साक्षीदार क्र.३ **भाग्यश्री कांबळे** (तपासी अंमलदार) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०४.०२.२०२२ रोजी त्यांना गुन्हयाचा तपास मिळाला. तपास मिळाल्यानंतर आरोपीला कलम ४१अ फौ.प्र.सं.प्रमाणे सोडण्यात आले. आरोपी महिला असल्याने तिचे चहरेपटटी व फिंगर प्रिंट घेण्यात आले. त्यांना चेहरेपटटी व कलम ४१अ फौ.प्र.सं.नोटीस नि.क्र.२७ व २८ दाखविण्यात आले. तसेच सि.ए.फार्म तयार करण्यात आला. त्यानंतर प्रॉपर्टी फॉर्म भरण्यात आला. त्यानंतर मोहररकडून माल पावती घेण्यात आली. त्यांना माल पावती नि.क्र.२९ दाखविली. त्यानंतर पंच व साक्षीदारांचे बयाण नोंदविले व दोषारोपपत्र तयार केले. त्याच्या तपासात निष्पन्न झाले की, महिला आरोपी दारू व्यवसाय करते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

६. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

७. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने तीन साक्षीदार तपासले तसेच साक्षदार हे पोलिस कर्मचारी आहे. जोपर्यंत त्यांचे साक्षेला इतर स्वतंत्र साक्षीदार दुजोरा करत नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य मोहासडवा असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. २ करिताः**

८. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. आरोपी **अनुसया सुरेश उरेल,** हीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २६९ व मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल जागेवर नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.05 17:40:38 +0530

(एस.एम.एच.शाहिद)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी

दि.०५.०५.२०२६